# ।। प्रश्न उत्तरच्या अंगातील रेखत्याचे भाषांतर ।।
## मारवाडी+ मराठी
## सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

।। अथ ।। प्रश्न उत्तरच्या अंगातील रेखत्याचे ।।

।। भाषांतर प्रारंभ ।।

प्रश्न ।। थे किसा राम ने गावो ।।

ऊत्तर ।। रेखता ।।

पाँच जिण तत्त बेराट आप थरपीयो ।। बिस्न ब्रम्हा हर पेदास कीया ।।
पीर अवतार सिव सक्त के ऊपरे ।। दुज कूं ग्यान का मुळ दीया ।।
अलख अलेख अल्लाह खुदाय सो ।। काळ हुणार ऊण राम सारे ।।
पलक मे मांड नर नार सो थरपीया ।। छिनक मे सब कूं मार डारे ।।
कागदा ऊपरे राम मंडे नही ।। मुख मे जीभ पर नाही आवे ।।
दास सुखराम पर ब्रम्ह ने रट रहया ।। संत कोई सूंर्वा भेद पावे ।।३४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना कोणी विचारले,तुम्ही कोणत्या रामाचे स्मरण करतात?आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी त्याला उत्तर देऊन सांगितले की,मी ज्या रामाने आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी हे पाच तत्व बनविले आहे तसेच तीन लोक चौदा भवना सोबत ब्रम्हच्या तेरा लोकांचा वैराट स्थापन केला आहे,त्या रामाला गातो. मी ज्या रामाने सतोगुणी विष्णू,रजोगुणी ब्रम्हा व तमोगुणी हर म्हणजे महादेवाला उत्पन्न केले आहे व जो राम पीर,अवतार,शिव व शक्तीच्या वर आहे तसेच ज्या रामाने ब्रम्हाला चार वेदांच्या ज्ञानाचे मुळ दिले आहे,त्या रामाला भजतो.जो राम डोळ्यांनी दिसत नाही असा अलख आहे,कागदांवर लिहिला जात नाही असा अलेख आहे,अल्लाह आहे,ज्याला कोणी बनविले नाही असा खुदा आहे परंतु ज्याने ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,तीन लोक चौदा भवन सर्वांना बनविले आहे अशा रामाला मी गातो.ज्या रामाच्या स्वाधीन काळ तसेच होनहार आहे,त्या रामाला मी भजतो.ज्या रामाने एका पळात सर्व सृष्टीची स्थापना केली व जो राम स्थापना केलेली सर्व सृष्टी पळभरात मिटवू शकतो तसेच ज्या रामजीने क्षणभरात सर्व स्त्री,पुरुषांना उत्पन्न केले व पळभरात सर्वांना मिटवू शकतो असा जो राम आहे त्याला मी गातो.तो सतस्वरुप राम,रामनाम जिभेवर रटल्याने घटात ने:अक्षर ध्वनीच्या रुपात प्रगट होतो ती ने:अक्षर ध्वनी म्हणजे रामाचे नाव कागदावर लिहिले जात नाही व मुखाने जिभेवर घेतले जात नाही म्हणजे बोलून दाखवता येत नाही अशा रामाला जगाचे ज्ञानी,ध्यानी सतस्वरुप पारब्रम्ह म्हणतात,त्याला मी रटत आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगात त्या रामाला प्रगट करण्याचा भेद विरळ्या शूरवीर संतालाच मिळतो.।।३४।।

रमता राम सूं हेत हम बांधीयो ।। बोलतां राम सूं प्रीत कीनी ।।
देह आकार का नांव सब प्रह्न्या ।। अर्ध अर ऊर्ध बिच सुरत दीनी ।।

पाँच पचीस सूं राम न्यारा रहे ।। दिष्ट अर मुष्ट ने नाय आवे ।।
ध्रण पाताळ अस्मान सूं अगम हे ।। क्रोड मज संत कोई गम पावे ।।
पुरणा राम भ्रपूर सो भर रया ।। जाय ब्रहमंड ररंकार ध्याऊँ ।।
दास सुखराम के सब्द अरूप हे ।। जिंग सी धुन्न से राम गाऊँ ।।३५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो राम सर्वात घटामध्ये आधीपासून रमून राहिला आहे,अशा सतस्वरुप रामाशी मी प्रेम केले आहे व जो आत्माराम पाच तत्वाचा देह धारण करुन मुखाने बोलून राहिला आहे असे सर्व देहधारी आत्मारामाशी मी प्रीती केली आहे तसेच रामचंद्र इत्यादी सारखे सर्व जे जे होणकाळाच्या मुखात ठेवणारी आकारी रुपात आलेले मायावी अवतारी देह आहेत,त्या सर्वांना सतज्ञानाने होणकाळाचे रुप समजून त्यागले आहे.मी येत्या जात्या श्वासात त्या रामाशी सुरत लावली आहे.हा राम पाच तत्व व पंचवीस प्रकृतीहून वेगळा आहे.हा राम अवतारी रामचंद्र जसा चर्मदृष्टीने दिसतो तसेच हात लावून समजला जातो तसे तो ना चर्मदृष्टीने दिसतो,ना हात लावून समजला जातो.हा राम मायावी वस्तु जशा मुठ्ठीत पकडल्या जातात तसे मुठ्ठीत पकडला जात नाही.हा राम धरती,पाताळ तसेच आकाशासारख्या इत्यादि वस्तुंना जोडून तोलून समजू शकेल असा नाही.हा राम धरती,पाताळ,आकाशाहून अगम आहे.हा राम धरती,पाताळ,आकाश इत्यादी वस्तुंना जसे ज्ञानाने समजू शकतो,त्या समजच्या पलिकडे वेगळा आहे.या रामाची समज कोट्यावधी,अरबो संतांमध्ये एखाद्या संताला येते.हा राम पूर्ण ब्रम्ह आहे.त्याच्यात होणकाळ रामासारखी इच्छे सोबत भोग करण्याची वासना नाही किंवा रामचंद्र धरुन सर्व आत्मारामा सारखी पाची विषय वासना भोगण्याची चाहणा नाही.हा राम सत वैरागी आहे.हा राम तीन लोक,चौदा भवन व तीन लोकांचे चौदा भवनाचे बनलेल्या ब्रम्हांडात ओतप्रोत भरला आहे तसेच या ब्रम्हांडाच्या पलिकडे ही भरपूर असा अखंडीत,अपार,विशाल आहे.तो राम सतगुरुच्या मेहेरने शिष्याच्या घटात ब्रम्हडांत प्रगट रुपाने दिसतो.अशा रामजीला मी माझ्या देहाच्या रोमा रोमाने ररंकार शब्दाचे उच्चारण करुन ध्यावतो.तो सतशब्द राम अरुप आहे,त्याला मी रोमा रोमाने ररंकारा सोबत जींग ध्वनीने दहाव्याद्वारात गातो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३५।।

नही बाप अर माय ।। नही बेणर सुण भईया ।।
नही देस कुळ गांव ।। नही किण सरण न रहीया ।।
नही ग्यान गुर सिष ।। नही आपो तन काया ।।
नही वार कुछ पार ।। नही कहूँ जायकर आया ।।
अेसा अदभुत राम हे ।। जाँ कूं सिंवरूं बीर ।।

तां कूँ सुण सुखराम के ।। भजीयो दास कबीर ।।३६।।

मी ज्या रामाला गातो,त्या रामाला जगातील लोकांसारखे आई–वडिल नाही तसेच बहिण आणि भाऊ नाही.त्याला जगातील स्त्री–पुरुषासारखे काही कुळ,गाव तसेच देश नाही. त्या रामजीने जगातील स्त्री–पुरुषांसारखा कोणाचा आश्रम किंवा शरणा घेतला नाही. त्या रामजीला जगातील लोक जसे गुरु बनवितात तसा गुरु नाही तसेच जगातील गुरु जसे शिष्य बनवितात तसा त्याला शिष्य ही नाही.त्याचे ज्ञान माया समजने समजेल असे नाही.त्याला कोणाशी काही आपलेपणा नाही तसेच कोणाशी वैरभाव नाही.त्याला ३ लोक १४ भवनाच्या जीवांच्या काये सारखी काया नाही तसेच जगातील ज्ञानी,ज्ञानाने मायेचा तोल मोल,वारपार घेतात तसा त्याचा कोणाला तोल मोल,वारपार घेता येत नाही,तो अपार आहे.येथे जसे जगातील हंस मृत्युलोकातून तीन लोक चौदा भवनात कोठे ही जातात आणि तीन लोक चौदा भवनातून मृत्युलोकात जन्म घेऊन येतात असा हा राम तीन लोक चौदा भवनात जीवांसारखा कोठे जात नाही किंवा कोठून येतही नाही. तो सर्वांमध्ये आधीपासून जसा भरला होता तसाच शेवटपर्यंत भरलेला राहतो. त्याला कोणत्याही मायेच्या वस्तुंसोबत तोलमोल जोडून सांगता येत नाही.असा तो अद्‌भूत आहे.असा जो राम काल ही होता,आज ही आहे आणि उद्या ही राहिल व अशी कधी वेळ येणार नाही की तो राहणार नाही अशा अद्‌भूत रामाचे मी स्मरण करतो.अशाच अद्‌भूत रामाला माझ्या आधी पूर्व काळात संत कबीरजींनी भजले.।।३६।।

।। इति ।। प्रश्न उत्तरच्या अंगातील रेखत्याचे भाषांतर संपूर्ण ।।